# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

ई-मेल: - smkcnhm@gmail.com

रजिस्ट्रेशन नं. - महाराष्ट्र/७६०/०५/सांगली दि.१५/१२/२००५


जा. क्र. /मनपा/आरोवि/राआअ/१८६/२०२४ दि. ०४/१२/२०२४

## जाहिर सुचना

**विषय:** राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्पांतर्गत विविध प्रशिक्षणाकरिता उपस्थित प्रशिक्षक/प्रशिक्षणार्थी यांना चहा, नास्टा, जेवण, पाणी व इतर अनुशंगीक पुरवठा करण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत

राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्पांतर्गत विविध प्रशिक्षणाकरिता उपस्थित प्रशिक्षक/प्रशिक्षणार्थी यांना चहा, नास्टा, जेवण पाणी व इतर अनुशंगीक वार्षिक खरेदी पुरवठा करण्यासाठी मान्यता प्राप्त व इच्छुक स्थानिक पुरवठादरांकडून खालीलप्रमाणे वार्षिक खरेदी दरकरार दरपत्रक मागवणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | संख्या/नग | कोटेशन दर |
|---|---|---|---|
| १ | चहा/कॉफी | १०० मि.ली. | |
| २ | नाष्टा:- कांदा पोहे, वडा सांबर, इडली सांबर, वटाटा वडा, समोसा, कचोरी, पुरी भाजी, मिसळ पाव, उपमा, शिरा इत्यादी | २०० ग्रॅम | |
| ३ | नाष्टा: - कांदा पोहे, वटाटा वडा, समोसा, कचोरी, उपमा, शिरा इत्यादी | १०० ग्रॅम | |
| ४ | जेवन:- शाकाहारी जेवन नियमित, मिष्टान्न (दोन भाज्या, गोड पदार्थ व इतर) पोटभर | प्रतिनग | |
| ५ | जेवन:- साधे शाकाहारी जेवन (पोळी भाजी व इतर) | प्रतिनग | |
| ६ | पिण्याचे पाणी: जार २० लिटर | प्रतिनग | |
| ७ | पिण्याचे पाणी: १००० मि.लि. बॉटल | प्रतिनग | |
| ८ | प्रशिक्षण हॉल: ३०-१२० क्षमता, डेस्क, टेबल व खुर्चीसह | १ | |
| ९ | साउंड सिस्टिम माईकसह | प्रतिनग | |
| १० | प्रोजेक्टर आणि स्क्रीनसह | प्रतिनग | |
| ११ | स्टेशनरी: - पेन, पॅड, फोल्डर (साधारण) | प्रतिनग | |
| १२ | स्टेशनरी: - पेन, पॅड, फोल्डर (एक्सीक्युटिव) | प्रतिनग | |

यास्तव सदर तपशिलामध्ये नमुद केल्याप्रमाणे चहा, नास्टा, जेवण पाणी व इतर अनुशंगीक पुरवठा करण्यास आपण इच्छूक असल्यास त्यासंदर्भातील आपले दरपत्रक दि. 11 / 12 /२०२४ पर्यंत कार्यालयास स्वहस्ते/ पोस्टाने कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावी. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:**

१) दरपत्रक "Medical Officer of Health, Sangli Miraj Kupwad Municipal Corporation" यांचे नांवे सादर करावे व लखोटयावर "राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्पांतर्गत विविध प्रशिक्षणाकरिता उपस्थित प्रशिक्षक/प्रशिक्षणार्थी यांना चहा, नास्टा, जेवण पाणी व इतर अनुशंगीक पुरवठा करणेकामी" असा उल्लेख असावा.

२) देय्यक रक्कम मंजूर दराप्रमाणे NEFT/PFMS व्दारे अदा करणेत येईल.

३) कोणताही पुरवठा निकृष्ट दर्जाची असल्याचे आढळून आल्यास ती बदलून नविन देणे बंधनकारक राहिल.

४) दरपत्रक सादर करताना स्थानिक बाजारातील पुरवठदारांचा विचार करण्यात येईल.

५) प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

६) यादीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्याबाबी आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येतील. तसेच महाराष्ट्र शासन निर्णय, उदयोग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस२०२१/प्र.क्र.८/उदयोग-४ मंत्रालय, मुंबई दिनांक ७/५/२०२१ विभागाकडील शासन निर्णयामधील मार्गदर्शनानुसार एका बाबीची वार्षिक खरेदी दरपत्रकाअन्वये ही रक्कम रु. १० लाखच्या मर्यादेमध्ये करणेत येणार आहेत.

७) मंजुर दरपत्रकाप्रमाणे मागणीनुसार नमुद दिनांका दिवशी वरील पुरवठा करणे बंधनकारक आहे. वेळेत पुरवठा न झालेस आपल्या संस्थेचे नाव काळया यादीमध्ये नोंदवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८) पुरवठादाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. दरपत्रक मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचनेशिवाय दरकरार रदद करण्यात येईल आणि मंजूर पुरवठाधारकाचे नाव काळया यादीत घालणेची कारवाई केली जाईल.

९) काही तांत्रिक अडचणीमुळे दरपत्रक नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता दरपत्रक प्रक्रिया रदद करणेचा अधिकार मा. वैदयकीय आरोग्य अधिकारी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

(डॉ. वैभव पाटील)
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
सांगली मिरज कुपवाड
महानगरपालिका